MHAH230007192024 नियमीत दिवाणी दावा क्रमांक २९०/२०२४

कविता गणेश झेंडे
वि.
भारती सदाशिव खेडकर व इतर

## निशाणी क्र.१५ वरील आदेश

[०१] वादीच्या कथनानुसार दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकत ही दिनांक ०८-०८-२०२५ रोजी प्रविण प्रकाश शिंदे आणि महादेव मुर्कींदा झेंडे यांच्या हक्कात खरेदीखत दस्त क्रमांक ५८९८/२०२५ अन्वये बेकायदेशीररित्या खरेदीखताने विक्री केलेली आहे. त्या अनुषंगाने दाव्यात प्रतिवादीच्या कक्षेत प्रस्तावित प्रतिवादी नं.३. प्रविण प्रकाश शिंदे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. अकोळनेर, ता. जि. अहिल्यानगर आणि प्रतिवादी नं. ४ महादेव मुर्कींदा झेंडे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. चिखली, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर यांना आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने दाव्याच्या कलम ६ नंतर ६अ व ६ब हे कलम वाढवून अर्जात नमुद केल्याप्रमाणेचा मजकुर लिहून तशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर दाव्यातील कलम ९मधील ब नंतर ब१ व ब२ म्हणून अर्जात नमुद केल्याप्रमाणेचा ज्यादा मजकूर समावेश करणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती ही केवळ दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादींनी दावा मिळकतीची बेकायदेशीरपणे विक्री केल्याने न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाहीत. याउलट, सदर दुरुस्तीमुळे दाव्याचा गुणदोषावर न्यायनिवाडा होण्यास मदत होणार आहे. सबब, अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

[०२] प्रतिवादींतर्फे अर्जास म्हणणे दाखल करण्यात आले. प्रतिवादींनी न्यायास व हकीकतीस अनुसरुन योग्य तो आदेश व्हावा, अशी विनंती केली.

[०३] अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

[०४] प्रस्तुत दावा वादी यांनी जाहिर ठराव व निरंतर मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केला आहे. परंतु, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा प्रलंबित असताना दावा मिळकत ही दिनांक ०८-०८-२०२५ रोजी प्रविण प्रकाश शिंदे आणि महादेव मुर्कींदा झेंडे यांच्या हक्कात खरेदीखत दस्त क्रमांक ५८९८/२०२५ अन्वये बेकायदेशीररित्या खरेदीखताने विक्री केलेली आहे. त्यामुळे प्रस्तावित प्रतिवादी क्र. ३ व ४ हे प्रस्तुत दाव्यास आवश्यक पक्षकार ठरतात. पर्यायाने, सदर दाव्याच्या शिषर्कामध्ये प्रस्तावित प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना प्रतिवादीपणात सामील करुन घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट होते. तसेच, प्रस्तुत अर्जात वादी सुचित करत असलेली दुरुस्ती ही दावा दाखल केल्यानंतर घडलेल्या घडामोडी संदर्भातील असल्यामुळे कायदयाचे दृष्टीने व दाव्याचे अंतिम निराकरण होण्याचे दृष्टीने त्यास परवानगी देणे न्यायोचित ठरते. तसेच, प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

**(१)** अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**(२)** वादीने प्रतिवादी नं. ३. प्रविण प्रकाश शिंदे आणि प्रतिवादी नं. ४ महादेव मुर्कींदा झेंडे यांना दाव्यात समाविष्ट करुन अर्जात नमुद केल्याप्रमाणे इतर सुचित दुरुस्ती प्रस्तुत दाव्यात या आदेशापासून १४ दिवसाच्या आत करावी व तशी दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

**(३)** प्रस्तावीत प्रतिवादींना दाव्यात हजर करणेकामी योग्य ती दखल वादीने घ्यावी.

**(४)** अर्जाचा खर्च अर्जदाराने सोसावा.

PATIL PRAVIN VISHWAS
Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2025.11.14 18:06:51 +0530

(प्रविण वि.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
श्रीगोंदा.

दिनांक:- १४-११-२०२५.

## :-CERTIFICATE-:

I affirm that, the contents of this pdf file order are same, word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Case No. | :- | RCS No. 290/2024 |
| Name of Stenographer | :- | Smt. N. D. Dawat |
| Court Name | :- | Jt. C.J.J.D.& J.M.F.C, Shrigonda. |
| Date of Decision | :- | 14-11-2025 |
| Order signed by P.O. on | :- | 14-11-2025 |
| Order uploaded on | :- | 14-11-2025 |